**<u>ठळक बातम्या</u>**

- आज लक्ष्मीपूजन, शेअर बाजारात मुहूर्ताच्या सौद्यांमध्ये तेजी

- रेल्वे तिकीट आरक्षणाचे नवीन नियम आजपासून लागू, दिवाळी छठ पूजेनिमित्त विशेष गाड्यांची सोय

- झारखंड विधानसभा निवडणुकीसाठी अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया पूर्ण, ८१ जागांवर एकूण १ हजार ३१९ उमेदवार रिंगणात

- भारत आणि चीन सैन्याकडून पूर्व लदाखमधे प्रत्यक्ष नियंत्रण रेषेजवळ गस्त सुरू

**आणि**

- भारत - न्यूझीलंड तिसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात पहिल्याच दिवशी १४ गडी बाद

**<><><><><>**

दीपावलीच्या प्रकाश पर्वानिमित्त सर्वत्र उत्साहाचं वातावरण आहे. दीपोत्सवात मानाचा लक्ष्मीपूजनाचा सण आज साजरा होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. लक्ष्मीपूजनासाठी कमळासह विविध प्रकारची फुलं, नैवेद्यासाठी नाना तऱ्हेची पक्वान्नं, पूजेसाठी फडे-केरसुण्या, लक्ष्मीला अर्पण करण्याची शुभचिन्हं आणि सौभाग्यालंकार, तसंच विविध पूजा साहित्यानं सजलेल्या बाजारपेठा, खरेदीसाठी आलेल्या ग्राहकांच्या विशेषत: महिलांच्या गर्दीनं आज फुलून गेल्या होत्या. आत्ता सायंकाळी घरोघरी पारंपरिक पद्धतीनं लक्ष्मीपूजन केलं जात असून, हौशी नागरिक, विशेषत: युवा वर्ग आणि लहान मुलं फटाके

फोडण्यात गुंग आहेत. मंद तेवणाऱ्या पणत्यांसह, विद्युत रोषणाईच्या झगमगत्या माळा, नाना तऱ्हेचे आकाशदिवे, आणि आकाश व्यापून टाकणाऱ्या नयनरम्य आतिषबाजीने आसमंत उजळून गेला आहे.

<><><><><>

रेल्वे तिकीट आरक्षणाचे नवीन नियम आजपासून लागू झाले आहेत. रेल्वेनं याआधी असलेल्या १२० दिवसांच्या आरक्षण कालावधीत कपात करून तो ६० दिवसांवर आणला आहे. मात्र, ३१ ऑक्टोबरपर्यंत झालेली आरक्षणं कायम राहतील अशी माहिती रेल्वेनं दिली आहे. ६० दिवसांच्या आरक्षण कालावधीमुळे तिकिटांच्या उपलब्धतेच्या शक्यता वाढून त्याचा प्रवाशांना थेट लाभ मिळेल असं रेल्वे प्रशासनानं म्हटलं आहे. ६१ दिवस ते १२० दिवसांच्या कालावधीसाठी केलेलं तिकीट आरक्षण प्रवाशांकडून रद्द करायचं प्रमाण २१ टक्के एवढं होतं अशी माहिती रेल्वेनं दिली आहे.

<><><><><>

दिवाळी आणि छटपूजा सणांच्या पार्श्वभूमीवर रेल्वे प्रवाशांच्या संख्येत होणारी वाढ लक्षात घेऊन मध्य रेल्वे २ आणि ३ नोव्हेंबर २०२४ रोजी अतिरिक्त विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. याअंतर्गत दोन्ही दिवस मुंबईतल्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, दादर, लोकमान्य टिळक टर्मिनस आणि पनवेल या स्थानकांवरून गोरखपूर, दानापूर, छपरा, काझीपेठ या ठिकाणांसाठी प्रत्येकी ५ गाड्या सोडल्या जाणार आहे.

महत्वाचा सण साजरा करताना रेल्वे प्रवाशांना विनाअडथळा प्रवास करता यावा यासाठी विशेष गाड्या सोडत असल्याचं रेल्वेनं म्हटलं आहे.

<><><><><>

राष्ट्रीय शेअर बाजार आणि मुंबई शेअर बाजारात आज लक्ष्मीपूजना निमित्त सुट्टी आहे. मात्र व्यापाऱ्यांचं नव वर्ष विक्रम संवत २०८१ च्या प्रारंभानिमित्त आज संध्याकाळी ६ ते ७ दरम्यान मुहूर्ताचे सौदे झाले. त्यात सेन्सेक्स ३३५ अंकांनी वधारून ७९ हजार ७२४ अंकांवर बंद झाला. निफ्टी ९४ अंकांनी वधारून २४ हजार ३०० अंकांवर बंद झाला.

<><><><><>

गेल्या महिन्यात, देशातल्या गुंतवणूकदार संस्थांनी शेअर बाजारात १ लाख कोटी रुपयापेक्षा जास्त गुंतवणूक केली. ही त्यांची एका महिन्यातली सर्वोच्च गुंतवणूक आहे. परदेशी गुंतवणुकदारांनी काढून घेतलेली गुंतवणूक त्यांनी भरून काढली. त्यामुळे देशांतर्गत गुंतवणूकदार संस्थांची गुंतवणूक सुमारे ४ लाख २१ हजार कोटी रुपयांवर पोचली आहे.

<><><><><>

झारखंड विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज मागं घेण्याची प्रक्रिया आज पूर्ण झाली. या टप्प्यासाठी सहाशे चौतीस उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. तिथे दुसऱ्या टप्प्यात ३८ जागांसाठी येत्या २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. दरम्यान पहिल्या टप्प्यात ४३ जागांसाठी १३ नोव्हेंबरला मतदान होणार असून, या टप्प्यात एकूण ६८५ उमेदवार रिंगणात आहेत.

<><><><><>

राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी आचारसंहिता लागू झाल्यापासून आजपर्यंत सी-व्हिजिल ॲपवर आलेल्या २ हजार ६२ तक्रारींपैकी २ हजार ५९

तक्रारी निवडणूक आयोगानं निकाली काढल्या आहेत. मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं ही माहिती दिली.

दरम्यान राज्य आणि केंद्र सरकारच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांनी केलेल्या कारवाईत बेकायदा पैसे, दारू, अंमली पदार्थ, आणि मौल्यवान धातू इत्यादी २३४ कोटी ४९लाख रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे.

**<><><><><>**

मुंबादेवी विधानसभा मतदार संघातल्या शिवसेनेच्या उमेदवार शायना एन.सी यांच्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचा गुन्हा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार अरविंद सावंत यांच्या विरोधात आज दाखल करण्यात आला. नागपाडा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ७९ आणि कलम ३५६/२ नुसार शिवसेनेनं तक्रार नोंदवल्यानंतर सावंत यांच्या विरोधात हा गुन्हा दाखल केला.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात उद्या हिंगोली आणि परभणी जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

आर्थिक दृष्ट्या व्यवहारी असलेली आश्वासनंच जनतेला द्यावी, असा सल्ला काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी पक्षाच्या प्रदेश समित्यांना दिला आहे. त्यावर भाजपानं आज  टीकास्त्र सोडलं.  काँग्रेस खोटी आश्वासनं देत असल्याची

टीका प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमातून केली आहे. काँग्रेसप्रणीत खोट्या आश्वासनांच्या संस्कृतीबाबत लोकांनी दक्ष राहिलं पाहिजे, असं त्यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

वस्तू आणि सेवा कर महसूल ऑक्टोबर महिन्यात ९ टक्क्यांनी वाढला आहे. गेल्या वर्षीच्या ऑक्टोबरमधे एक लाख ७२ हजार कोटी रुपये महसूल वस्तू आणि सेवा करापोटी मिळाला होता. तो यंदा एक लाख ८७ हजार कोटी रुपयांच्या पलिकडे गेला आहे. देशांतर्गत खरेदी विक्री व्यवहारांमधे वाढ झाल्यामुळे करमहसुलात वाढ झाली असल्याचं सरकारी पत्रकात म्हटलं आहे.

<><><><><>

बनावट कंपन्या तयार करुन काळा पैसा बेकायदेशीर रित्या परदेशात पाठवणारी गुन्हेगारांची टोळी हरयाणा पोलिसांच्या गुन्हे शाखेनं उघडकीला आणली आहे. या प्रकरणी आतापर्यंत ७ जणांना अटक केली असून ५ ओरोपींविरुद्ध पुराव्यांसह आरोपपत्र न्यायालयात दाखल केलं आहे. या आरोपींनी परदेशी कंपन्यांच्या खात्यामधे बेकायदेशीर रित्या सुमारे ७०० कोटी रुपये पाठवले असल्याचं तपासात आढळलं असं पोलिसांनी सांगितलं.

<><><><><>

भारत आणि चीनच्या सैन्याने पूर्व लदाखमधे प्रत्यक्ष नियंत्रण रेषेजवळ गस्त सुरु केली आहे. देम्चोक परिसरात चार ते साडेचारवर्षांपूर्वी दोन्ही देशांच्या सैन्यदलांमधे चकमक झाल्यानंतर तिथं गस्त बंद होती. देप्सँग परिसरातली गस्तही लौकरच सुरु होईल. प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरुन सैन्य मागं घेण्याबाबत दोन्ही देशांदरम्यान अलिकडेच सहमती झाली आहे. दिवाळी निमित्त दोन्ही सैन्यांच्या जवानांनी आज

एकमेकांना मिठाई देत शुभेच्छा दिल्या. चुशूल मोल्डो, दौलत बेग ओल्डी, केके पास हॉट स्प्रिंग आणि कोंगक्ला इथं हा कार्यक्रम झाला.

<><><><><>

इंडोनेशियात जकार्ता जवळच्या बेकासी शहरातल्या औद्योगिक वसाहतीत एका खाद्यतेल उत्पादन कंपनीला लागलेल्या आगीत ८ जण ठार झाले असून ९ जण जखमी झाले आहेत. दुर्घटनास्थळावरुन सर्व मृतदेह बाहेर काढले असल्याची माहिती प्रशासनानं दिली असून अग्निशमन दलाच्या २० बंबांनी आगीवर नियंत्रण मिळवलं. ९ जणांना सुरक्षित बाहेर काढण्यात आलं असून मृतांचा आकडा वाढण्याची भिती व्यक्त केली जात आहे.

<><><><><>

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात कसोटी क्रिकेट मालिकेतल्या मुंबईच्या वानखेडे मैदानावर सुरु असलेल्या तिसऱ्या आणि अखेरच्या सामन्यात आज पहिल्याच दिवशी एकूण १४ गडी बाद झाले. आजच्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा भारताच्या पहिल्या डावात ४ बाद ८६ धावा झाल्या होत्या. पहिल्या डावात भारत अजूनही १४९ धावांनी पिछाडीवर आहे.

या सामन्यात न्यूझीलंडनं नाणेफेक जिंकून पहिली फलंदाजी करायचा निर्णय घेतला. मात्र ठराविक अंतरानं त्यांचे फलंदाज बाद होत गेले, आणि त्यांचा पहिला डाव २३५ धावांत आटोपला. भारताच्या वतीनं रविंद्र जडेजानं न्यूझीलंडचे ५ तर वॉशिंग्टन सुंदर यानं ४ गडी बाद केले. न्यूझीलंडच्या डॅरील मिचेल यानं सर्वाधिक ८२ धावा केल्या.

त्यानंतर पहिल्या डावात फलंदाजीसाठी आलेल्या भारताची सुरुवातही खराब झाली कर्णधार रोहित शर्मा आणि विराट कोहली यांना पुन्हा एकदा अपयश

आलं. नाईट वॉचमन म्हणून आलेला मोहम्मद सिराज शून्यावर, तर यशस्वी जयस्वाल ३० धावा करून परतला.

सध्या शुभमन गील ३१ तर ऋषभ पंत एका धाव करून खेळपट्टीवर आहे. या मालिकेतले पहिले दोन्ही सामने जिंकून न्यूझीलंडनं २-० अशी आघाडी घेतली आहे.

<><><><><>

बोत्सावानाचे राष्ट्राध्यक्ष मोकविटसी मासिसी यांच्या सत्ताधारी पक्षानं गेल्या साठ वर्षात पहिल्यांदाच आपलं बहूमत गमावलं आहे. या निवडणुकीच्या सुरुवातीच्या निकालांवरुन त्याच्या पक्षाचा पराभव झाल्याचं स्पष्ट झालं आहे.

<><><><><>

भारत आणि अमेरिकी लष्करांच्या विशेष दलांच्या संयुक्त सरावाच्या १५व्या सत्रासाठी भारताच्या लष्कराची तुकडी आज रवाना झाली. अमेरिकेच्या इडाहो इथल्या युद्ध प्रशिक्षण केंद्रात उद्यापासून २२ नोव्हेंबरपर्यंत हा सराव सुरु राहील. यंदाच्या सरावाला वज्र प्रहार असं नाव दिलं गेलं आहे. या सरावात भारत आणि अमेरिकेचे प्रत्येकी ४५ जवान सहभागी होत आहे.

//<><><><><>//

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१ नोव्हेंबर २०२४ - शुक्रवार